ePaper

रम, रमी, रमणी आणि हनी ट्रॅपमध्ये राज्य सरकारचा कोठा; सामनाचा हल्लाबोल

| वर्ष - 8 । अंक - 343 | UDYAM-MH-26-0158827 |





# महाईन्यूज ™

**आतील पानांत**

- भारत-पाकिस्तान सामना रद्द!
- तुम्ही माझ्या बाबांना मारलं
- जगदीप धनखड यांनी दिला राजीनामा!
- ट्रम्प यांच्या 'त्या' दाव्यावरुन गदारोळ

www.mahaenews.com । मंगळवार, दि. 22 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याबाबत संतापाची लाट, अजितदादांकडून सूरज चव्हाणांचा राजीनामा, कोकाटेंना 'अभय'?

# कोकाटेंचा 'पत्ता' कट होणार!

## एक 'डाव' कोकाटेंचा.. मुख्यमंत्री म्हणाले : कोकाटेंचं चुकलंच, कोकाटे राजीनामा देणार?

। मुंबई / पुणे / लातूर । प्रतिनिधी । महाईन्यूज

**सतत वादाच्या भोवऱ्यात वावरणारे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे विधानसभेच्या सभागृहात रमी खेळणे आता चांगलेच चर्चिले जाऊ लागले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याची दखल घेतली असून कोकाटे यांचे चुकले आहे, असे ते म्हणाले. दरम्यान, मंगळवारी कोकाटे हे पत्रकार परिषद घेणार असून ते राजीनामा देतील असे खात्रीलायक वृत्त आहे.**

### फडणवीस काय म्हणाले ?

कोकाटे यांच्या विधानसभेत रमी खेळण्याच्या व्हीडिओवर मुख्यमंत्र्यांनी पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे. माणिकराव कोकाटे यांनी त्यावर स्पष्टीकरण दिले आहे, पण त्यांनी काहीही सांगितले असले, तरी ते आमच्यासाठी भूषणावह नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी या प्रकरणावरुन तीव्र नाराजी व्यक्त केली आणि आपण हा मुद्दा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी बोलू असेही ते म्हणाले.

### सूरज चव्हाणही लटकले

कोकाटे यांच्या या मूळ कथानकाला छावा संघटनेचे उपकथानक जोडले गेले. कोकाटे यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे लातूर येथे असताना छावा संघटनेने त्यांना निवेदन दिले आणि कोकाटे यांच्या निषेधाच्या घोषणा दिल्या. त्यावेळी राष्ट्रवादीचे युवा प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'छावा' च्या पदाधिकाऱ्यांना बेदम मारहाण केली. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चव्हाण यांचा राजीनामा घेतला. पण अजितदादा कोकाटे यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप देखील त्यामुळे झाला.

### कोकाटे यांची वर्तणूक संतापजनक..

महाराष्ट्रामध्ये सध्या शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट आहे. कर्जमाफीसाठी आंदोलने सुरू आहेत, तर रोज शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत आणि कृषिमंत्री मात्र सभागृहात गांभीर्याने चर्चा करण्याऐवजी रमी खेळत आहेत. त्यामुळे वातावरण चांगलेच पेटले आहे. त्यातच यापूर्वी कोकाटे यांनी शेतकऱ्यांचा अपमान करणारी अनेकदा वक्तव्ये केली असल्यामुळे संतापाच्या लाटेत भरच पडली आहे.



### राजीनाम्याची मागणी

कृषिमंत्री कोकाटेंचे एकूणच बेशिस्तीचे आणि बेजबाबदारीचे वर्तन पाहून त्यांच्या संदर्भात विरोधक फारच आक्रमक असून त्यांच्या राजीनामाची मागणी करण्यात येत आहे. कदाचित, आपला 'पत्ता' कट होणार हे त्यांच्या लक्षात आल्यामुळे ते राजीनामा देतील, असेही सांगण्यात येते. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी कोकाटेंचा सभागृहात रमी खेळतानाचा व्हीडिओ ट्विट केला होता, यामुळे राज्यात वातावरण चांगलेच तापले आहे. विरोधकांनी या मुद्द्यावरून सरकारची कोंडी केली असून, कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी सुरू आहे.

### छावा संघटनेतर्फे निवेदन आणि घोषणा..

दरम्यान, हा व्हीडिओ समोर आल्यानंतर याचा निषेध करण्यासाठी छावा संघटनेकडून सुनील तटकरे यांना निवेदन देण्यात आले, यावेळी कार्यकर्त्यांनी सुनील तटकरे यांच्यासमोर पत्ते फेकले, तसेच कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या संतप्त कार्यकर्त्यांनी छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना मारहाण केल्याच्या प्रकार घडला.

### ओसाडगावची पाटीलकी...

कृषिमंत्रीपदी नियुक्ती झाल्यापासून माणिकराव कोकाटे हे नेहमीच वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. सुरुवातीलाच ते म्हणाले कृषिमंत्रीपद म्हणजे ओसाडगावची पाटीलकी आहे. त्यानंतर शेतकऱ्यांना म्हणाले की कर्जमाफी कशासाठी? कर्ज माफ केले तर तुम्ही दारू सोडणार आहात का मिळालेले पैसे शेतीसाठी न वापरता मुला बाळांच्या लग्नावर तुम्ही उडवता, असेही त्यांनी म्हटले होते. कर्ज परत करता म्हणजे उपकार करता का? असा प्रश्न विचारून त्यांनी वाद वाढवून घेतला होता. बिनधास्त आणि बेमूर्वतखोर बोलण्याची फळे त्यांना मिळाली असून पाय उतार व्हावे लागणार आहे, हे नक्की!

### तटकरेंचे सूचक विधान..


कोकाटे यांचा रमीचा व्हीडिओ समोर आल्यानंतर कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे, यावर तुमचे मत काय? असा सवाल सुनील तटकरे यांना विचारण्यात आला, यावर उत्तर देताना त्यांनी कृषिमंत्र्यांच्या राजीनाम्याबाबत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि वरिष्ठ नेते निर्णय घेतील, असे सूचक विधान केले आहे. त्यामुळे आता कोकाटे यांचा राजीनामा घेतला जाणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# पोलखोल होत असल्याने गांधींवर आरोप!

## रॉबर्ट वाड्रा प्रकरणात राज्यातील कॉंग्रेस नेत्याची टीका

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**केंद्रातील मोदी सरकारची सर्वच स्तरावर पोल-खोल होत असल्याने बदनामीपासून वाचण्यासाठी विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्यावर भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी हे तथ्यहीन आरोप करत आहेत, अशी टीका कॉंग्रेस प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केली आहे.**





### सरकारच्या पायखालची वाळू सरकली

विरोधी पक्षनेते पदावर काम करणाऱ्या राहुल गांधी यांनी मेव्हणे रॉबर्ट वाड्रा यांच्यासाठी पदाचा कसा गैरवापर केला, हे स्पष्ट करावे. बोलायची संधी मिळाली म्हणून भाजपच्या प्रवक्त्यांनी तथ्यहीन आरोप केले आहेत, असे तिवारी यांनी स्पष्ट केले.तिवारी म्हणाले, 'रॉबर्ट वाड्रा यांनी कोणत्याही नियमांचा आणि कायद्याचा भंग केला नाही, याबाबतचे प्रतिज्ञापत्र एप्रिल २०२३ मध्ये भाजपच्या हरियाना सरकारला न्यायालयात दाखल करावे लागले. त्यामुळे त्यांच्या विरोधातील दाव्यांमधील हवा निघून गेल्याने भाजप नेत्यांचे मानसिक संतुलन बिघडले आहेतेतसेच निवडणूक आयोगाच्या कार्यप्रणालीवर प्रश्न उपस्थित करत असल्याने मोदी सरकारच्या पायखालची वाळू सरकली आहे

मोदी सरकारने स्वायत्त संस्थांचा राजकीय वापर करूनही २०२४ मध्ये देशातील जनतेने कॉंग्रेसच्या शंभर टक्के जागा वाढवून, मजबूत विरोधी पक्षनेते पद बहाल केले, तर भाजपच्या संसदेतील ३५ टक्के जागा कमी केल्या आहेत, असा दावा तिवारी यांनी केला. मतदारांनी लोकसभेतील जागा कमी केल्याचे भान भाजपने ठेवावे. विरोधी पक्षनेते पदावर काम करणाऱ्या राहुल गांधी यांनी मेव्हणे रॉबर्ट वाड्रा यांच्यासाठी पदाचा कसा गैरवापर केला, हे स्पष्ट करावे. बोलायची संधी मिळाली म्हणून भाजपच्या प्रवक्त्यांनी तथ्यहीन आरोप केले आहेत, असे तिवारी यांनी स्पष्ट केले.तिवारी म्हणाले, 'रॉबर्ट वाड्रा यांनी कोणत्याही नियमांचा आणि कायद्याचा भंग केला नाही, याबाबतचे प्रतिज्ञापत्र एप्रिल २०२३ मध्ये भाजपच्या हरियाना सरकारला न्यायालयात दाखल करावे लागले. त्यामुळे त्यांच्या विरोधातील दाव्यांमधील हवा निघून गेल्याने भाजप नेत्यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे. देशाचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी सक्षमपणे सांभाळले. ते केंद्रात सत्ताधारी असलेल्या मोदी सरकारच्या कारभारावर; तसेच निवडणूक आयोगाच्या कार्यप्रणालीवर प्रश्न उपस्थित करत असल्याने मोदी सरकारच्या पायखालची वाळू सरकली आहे.' 'केंद्रात सत्ताधारी झाल्यापासून गेल्या साडेअकरा वर्षात जंग जंग पछाडून देखील दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी, सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्या कुटुंबातील एक ही भ्रष्टाचार भाजप सरकार सिद्ध करू शकले नाहीत. विजय मल्ल्या, ललित मोदी यांनी पलायन केले. त्यांच्याकडून पदांचा दुरुपयोग केला जात आहे. त्यामुळे भाजपने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.'स्वातंत्र्योत्तर भारताच्या उभारणीत आणि लोकशाहीच्या रक्षणातील अमूल्य योगदान असल्याने जनतेचा नेहरू -गांधी कुटुंबीयांना पाठिंबा मिळत आहे. ते भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाला पचनी पडत नाही. त्यामुळे टोकाची ईर्षा आणि असुयेमुळेच राहुल गांधींच्या बदनामीचा घाट घालण्याचे प्रयत्न वारंवार भाजप कडून केले जात आहे.' असा आरोप तिवारी यांनी केला. मोदी सरकारने स्वायत्त संस्थांचा राजकीय वापर करूनही २०२४ मध्ये देशातील जनतेने कॉंग्रेसच्या शंभर टक्के जागा वाढवून, मजबूत विरोधी पक्षनेते पद बहाल केले, तर भाजपच्या संसदेतील ३५ टक्के जागा कमी केल्या आहेत, असा दावा तिवारी यांनी केला.मतदारांनी लोकसभेतील जागा कमी केल्याचे भान भाजपने ठेवावे.

# ...तर महाविद्यालयांवर कठोर कारवाई!

## मुलींच्या मोफत शिक्षण योजनेची अंमलबजावणी करणे गरजेचे

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महाविद्यालयांनी मुलींच्या मोफत शिक्षण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. या योजनेपासून एकही मुलगी वंचित राहणार नाही याची सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्य, विभागप्रमुखांनी गांभीर्याने नोंद घेण्याची सूचना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिली आहे. तसेच योजनेची अंमलबजावणी न करणाऱ्या महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्याचा स्पष्ट इशाराही विद्यापीठाकडून देण्यात आला आहे.**



### 50 टक्के ऐवजी 100 टक्के लाभ मंजूर

विद्यापीठाने या बाबतचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (ईडब्ल्युएस), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी), इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) या प्रवर्गातील मुलींना व्यावसायिक अभ्यासक्रमास शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करण्यात आला आहे.

विद्यापीठाने या बाबतचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (ईडब्ल्युएस), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी), इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) या प्रवर्गातील मुलींना व्यावसायिक अभ्यासक्रमास शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार सर्व शासकीय, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.तसेच उच्च शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणारी राजर्षि शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना या योजनेअंतर्गत मुलींना मोफत शिक्षण योजना राज्यात राबविण्यात येते. संबंधित योजनेसाठी उच्च शिक्षण विभागाअंतर्गत राजर्षि शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेच्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या सर्व अभ्यासक्रमांना मुलींना मोफत शिक्षण योजना लागू आहे. त्यामुळे संबंधित प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क न घेण्याबाबात शैक्षणिक संस्थांना सूचना दिलेल्या आहेत. संबंधित सूचनांचे पालन न करणाऱ्या संस्थांना समज देण्यात येईल, आवश्यकतेनुसार सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थावर कारवाई करण्यात येणार आहे.उच्च शिक्षण संचालनालयाअंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित मुलींना काही महाविद्यालये टाळाटाळ करत असल्याबाबत, तसेच काही महाविद्यालये मुलींकडून संपूर्ण फी आकारणी करत असल्याबाबत तक्रारी दाखल झाल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात मुलींना मोफत शिक्षण योजनेसाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयास सादर करावा असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## पाच लाख घरांची तपासणी

# साथीचे आजार रोखण्याचे “चॅलेंज”!

## महापालिकेकडून दंडात्मक कारवाईवर भर!

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड : डेंग्यू, मलेरिया यांसारख्या कीटकजन्य व जलजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेने तब्बल पाच लाख घरांची तपासणी केली असून, महापालिकेकडून जनजागृती आणि दंडात्मक कारवाईवर भर दिला आहे.**




महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपायुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून डेंग्यू आणि मलेरियासारख्या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी डास निर्मूलनाच्या उपाययोजना अधिक व्यापकपणे राबवण्यात येत आहेत. औषध फवारणीसह घरांची व कंटेनर तपासणी, भंगार दुकाने, बांधकामस्थळांची पाहणी, तसेच जनजागृती आणि दंडात्मक कारवाई यावर भर देण्यात येत आहे. महापालिकेची कारवाई महापालिकेने ५ लाख ४३ हजार ७६६ घरे, २८ लाख ९३ हजार ९३४ कंटेनर, १ हजार २३८ भंगार दुकाने, १ हजार ६०९ बांधकाम स्थळे अशा विविध ठिकाणांची तपासणी केली आहे. त्यांपैकी डास उत्पत्तीसाठी पोषक वातावरण असलेल्या ३ हजार ४३१ ठिकाणी नोटीस बजावण्यात आल्या असून ६२४ नागरिक व आस्थापनांवर थेट दंडात्मक कारवाई करीत २२ लाख २४ हजार इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

> पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून डेंग्यू, मलेरियाचा नायनाट करण्यासाठी जनजागृती करण्याबरोबरच डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी औषध फवारणी, तपासण्या आणि आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत. नागरिकांनी या उपक्रमात सहकार्य करून आपल्या परिसरातील स्वच्छता राखून या व्यापक मोहिमेस सहकार्य करावे
> —**शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका.

> डेंग्यू आणि मलेरियाचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य विभागाकडून करण्यात येत असलेल्या सर्व उपाययोजनांचा प्रभागनिहाय आढावा घेतला जात आहे. नागरिकांनी देखील आपले घर व परिसरात स्वच्छता राखावी. तसेच आठवड्यातून एक दिवस हा कोरडा दिवस म्हणून पाळावा.
> —**सचिन पवार,** उपायुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.

---

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महा रक्तदान शिबीर!

## आ. महेश लांडगे यांच्या पुढाकारातून आयोजन; विधायक उपक्रमातून समाजापुढे आदर्श

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड : राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महा रक्तदान शिबीर दि. 22 जुलै 2025 रोजी पिंपरी-चिंचवड शहरामध्ये विविध ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदानाचा संकल्प करून विधायक उपक्रमाचा आदर्श नागरिकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे आमदार महेश लांडगे यांनी या निमित्ताने सांगितले.**





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सकाळी दहा ते सायंकाळी चार वाजेपर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. यामध्ये युवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा असे आवाहन आमदार महेश लांडगे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरात विविध विधायक उपक्रम राबवले जात आहेत यामध्ये वृक्षारोपण दिव्यांग बांधवांना मदत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप यांसारख्या अनेक उपक्रमांचा समावेश आहे पिंपरी चिंचवड शहरांमध्ये रक्त संकलन करण्याचा उद्देश ठेवून मुख्यमंत्र्यांच्या वाढदिनी विविध ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

रक्तदान शिबिरामध्ये चिखली-कृष्णानगर विठ्ठल मंदिर, यादव नगर, कुदळवाडी. (9175483030), तळवडे-यमुनानगर हनुमान मंदिर, रुपीनगर मेन रोड, रुपीनगर (8483918918), ठाकरे मैदान, यमुनानगर (9822517144), मोशी-चऱ्होली, निलेश बोराटे जनसंपर्क कार्यालय, देहू रस्ता, मोशी (7610787878, 9518727934), वाघेश्वर महाराज क्रीडांगण, चऱ्होली बुद्रुक (9822926000), दिघी-गवळीनगर-गव्हाणे वस्ती विठ्ठल मंदिर, दिघी गावठाण, दिघी (9822804402) विदर्भ मित्र मंडळ, दिघी रोड भोसरी (7447435970) प्रभू रामचंद्र सभागृह, गव्हाणे वस्ती (9689222444) या ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी रक्तदात्यांनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

> पावसाळा संपल्यानंतर जलजन्य आजारातून उद्भवणाऱ्या अनेक आजारांमुळे रक्ताची गरज पडते याशिवाय वाढते अपघात अनेक शस्त्रक्रिया यांसाठी देखील गरजूंना रक्ताची आवश्यकता भासते. अशावेळी रक्ताचा तुटवडा उद्भवू नये यासाठी अनेक संस्थांच्या माध्यमातून रक्तदान शिबिर भरवण्याचा आम्ही प्रयत्न करत असतो. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण रुग्णालयांमध्ये दररोज शेकडो रुग्ण शहर तसेच शहराच्या लगतच्या भागातून येत असतात. आर्थिक दुर्बल असणाऱ्या या घटकांना अनेकदा रक्ताची गरज भासते. त्यामुळे यंदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रक्त संकलन करण्याचा मानस आहे. हा संकल्प याही पुढे सुरू राहणार आहे.
> - **महेश लांडगे, आमदार,** भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



### वेदाप्रमाणे नामही अनादी, अनंत, अपौरुषेय आहे.

शास्त्रामध्ये असे सांगून ठेवले आहे की, कृतयुगामध्ये ध्यानाने, त्रेतायुगामध्ये हवनाने, आणि द्वापारयुगामध्ये देवतार्चनाने भगवंताची प्राप्ती होते. परंतु कलियुगामध्ये त्यांपैकी काहीच साध्य होणे शक्य नसल्याने, भगवंताचे केवळ नाम घेतले असता मनुष्याला त्याचे दर्शन घडते. शास्त्राच्या या सिद्धांताचा संतांनी स्वत: अनुभव घेतला आणि लोकांना सांगितले की, साडेतीन कोटी जप केला असता चित्तशुद्धी होते; आणि तेरा कोटी जप केला असता, भगवंताचे दर्शन होते. मला आपण महत्त्व देऊ नका; पण ज्या थोर संतांच्या नावावर मी नामाविषयी सांगतो, ते ज्ञानेश्वरमहाराज, एकनाथमहाराज, तुकाराममहाराज आणि समर्थ रामदासस्वामी यांच्यासारखे संत कधी वेदबाह्य बोलतील, हे शक्यच नाही. वेदांना जे परमात्मस्वरूप अगोचर आहे ते स्वरूप संत तद्रूपत्वाने जाणतात. सध्याच्या परिस्थितीमध्ये संयमाची बंधने सुटत चालली आहेत, म्हणून संतांनी कळवळून ' नाम घ्या ' असे सांगितले. वेद भगवंताचे वर्णन करतात. नामदेखील भगवंताचेच अस्तित्व प्रकट करते. प्रत्येक वेदमंत्राच्या आरंभी ' हरि: ॐ ' असते, ते नामच आहे. जसा वेद हा अनादि, तसे नाम हे अनादि. जसा वेद हा अपौरुषेय, तसे नाम हे अपौरुषेय. जसा वेद हा अनंत, तसे नाम हे अनंत आहे. प्रत्यक्ष शिवाने नाम घेतले, म्हणून ते अनादि साधन आहे. इतर साधनांना आणि वैदिक कर्मांना आहारविहाराची बंधने आहेत, भगवंताच्या नामाला ती नाहीत. नाम हे आगंतुक नाही. आदिनारायणाने वेद सांगण्याच्या वेळी जो ॐ चा ध्वनी केला तेच नाम होय. म्हणून सर्वांना माझी विनंती आहे की, आपण नाम घेत जावे. किंबहुना, आपण नाम घेतले तरच वेदांचा खरा अर्थ आपल्याला कळेल अशी माझी खात्री आहे. वेद म्हणजे भगवंताची स्तुती होय. ती करीत असताना, म्हणजे वेद म्हणत असताना, आपले लक्ष शब्दांकडे नसावे, त्यांच्या अर्थाकडे असावे. अर्थ न समजला तरी लक्ष भगवंताकडे असावे. आपण नेमके तेवढेच विसरतो. नाम घेणाऱ्या लोकांनी शास्त्राच्याविरुद्ध वर्तन करू नये. आपल्याला शक्य आहे तितके वैदिक कर्म करावे, परंतु चित्तशुद्धी होण्यासाठी त्यावर पूर्णपणे विसंबून न राहता त्या कर्माच्या जोडीला भगवंताचे नाम घ्यावे. भगवंताला लबाडी खपत नाही. आपले मन स्वच्छ नसेल तर भगवंत हात आखडता घेतो, पण खरी अनन्यता असेल तर पोटभर पुरवितो. इतक्या तन्मयतेने नाम घ्या की, ' मी नाम घेतो आहे ' हे सुद्धा विसरून जा.

**बोधवचन:- इतर साधनांनी लवकर साधल्यासारखे वाटेल पण ते तात्पुरते असते. नामाने थोडा उशीर लागेल,**



**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**

**संस्थापक, संपादक**

# मुंबई बॉम्बस्फोटांचा निकाल धक्कादायक! म्हणे, फाशी सुनावलेले जगण्या लायक!

**संपूर्ण जगाला हादरवून टाकणाऱ्या ७/११ च्या मुंबई बॉम्बस्फोटांबाबत हायकोर्टाचा धक्कादायक निकाल लागला असून सर्वसामान्य नागरिकही आता चक्रावला आहे. अर्थात, महाराष्ट्र एटीएस सुप्रीम कोर्टात जाणार आहे, ही घटना मात्र थोडासा दिलासा देणारी आहे.**



### मुंबईच नव्हे, देश हादरला होता..

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला दि. ११ जुलै २००६ रोजी हादरवून सोडणाऱ्या लोकल ट्रेनमधील साखळी बॉम्बस्फोट प्रकरणावर मुंबई हायकोर्ट ने एक अत्यंत धक्कादायक निकाल दिला आहे. या स्फोटाच्या कानठळ्या थेट अमेरिका आणि रशियापर्यंत पोहोचल्या होत्या. फक्त मुंबईच नव्हे तर देशातील प्रत्येक नागरिक त्यामुळे हादरला होता, पण, आता उच्च हायकोर्टाचा निकाल ऐकल्यामुळे सर्वांचीच प्रचंड निराशा झाली आहे. असा कसा निकाल दिला गेला? हेच वाक्य प्रत्येकाच्या तोंडी आहे.

### २८४ मृत्यू, हजारावर जखमी..

मुंबईतील या साखळी स्फोटांमध्ये २८४ जणांचा मृत्यू झाला होता, तर हजारापेक्षा जास्त निष्पाप नागरिक जखमी झाले होते. तपास यंत्रणांनी या प्रकरणी अटक केलेल्या बारा आरोपींपैकी सत्र न्यायालयाने चार आरोपींना फाशीची, तर उर्वरित आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती, त्यावेळी सर्वांनी सुस्कारा टाकला होता. मात्र, आता हायकोर्टाने सत्र न्यायालयाचा हा निकाल पूर्णपणे फिरवत, सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. या निकालाचा धक्का एवढा मोठा आहे, की त्यातून अजून अनेक जण सावरलेले नाहीत, अनेकांची बुद्धी चाललेनाशी झाली आहे!

### बशीर खान, मुजम्मिल बाहेर येणार !

मुंबई हायकोर्टाच्या निकालाचा अनेकांना विलक्षण धक्का बसला असून, सध्या पुण्यातील येरवडा कारागृहात असलेले बशीर खान आणि मुजम्मिल शेख हे दोन आरोपी लवकरच बाहेर येण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या निकालावर सर्व स्तरांतून आश्चर्य व्यक्त होत असून, ज्येष्ठ विधिज्ञ आणि खा. उज्वल निकम यांनीही यावर प्रतिक्रिया दिली आहे. आता, या प्रकरणी महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने ( ए टी एस ) सुप्रीम कोर्टात धाव घेण्याचा निर्णय घेतला आहे, बघू या आता..म्हणतात ना.. भगवान के घर देर है लेकिन अंधेर नही ! सुप्रीम कोर्टात मनासारखा निकाल लागेल, अशी अपेक्षा करायला मुळीच हरकत नाही.

### एटीएसची भूमिका..पुढील पाऊल..

२००६ च्या पश्चिम रेल्वे साखळी बॉम्बस्फोट खटल्याप्रकरणी मुंबई हाय कोर्टच्या निकालानंतर महाराष्ट्र राज्य, दहशतवाद विरोधी पथकाने म्हणजे एटीएस ने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. दि. ३० सप्टेंबर २०१५ रोजी मोक्का विशेष न्यायालयाने या प्रकरणात पाच आरोपींना मृत्युदंडाची शिक्षा आणि सात आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती, तर एका आरोपीची निर्दोष मुक्तता केली होती. मात्र, मृत्युदंडाच्या संदर्भात आणि दोषी आरोपींच्या अपीलावर हाय कोर्टातील न्या. किलोर आणि न्या. चांडक यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू होती आणि अवघ्या जगताचे लक्ष या खटल्याकडे होते.

### राज्य सरकारची बाजू महत्त्वाची..

या खटल्यात अतिरिक्त सॉलिसीटर जनरल राजा ठाकरे आणि विशेष सरकारी वकील चिमलकर यांनी राज्य सरकारची बाजू मांडली होती. जुलै २०२४ पासून या खंडपीठासमोर सुनावणी सुरू होती आणि दि. २७ जानेवारी २०२५ रोजी अभियोग तसेच बचाव पक्षाचे युक्तिवाद पूर्ण झाले होते. हायकोर्टाच्या खंडपीठाने निकाल दिला, ज्यामध्ये मृत्युदंडाचे संदर्भ नाकारण्यात आले आणि दोषी आरोपींचे अपील मान्य करण्यात आले. विशेष न्यायालयाचा निकालही रद्द करण्यात आला आहे, ही बाब सर्वांसाठी धक्कादायक म्हणावी लागेल !

### सखोल विश्लेषणानंतरच निर्णय..

दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाने म्हटले आहे की, या खटल्याच्या विशेष अभियोक्त्यांशी सल्लामसलत करून आणि निकालाच्या सखोल विश्लेषणानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल. महाराष्ट्र एटीएसने मुंबई हायकोर्टच्या या निकालाविरोधात सुप्रीम कोर्टात जाण्याची तयारी केली आहे. सुप्रीम कोर्टात जाण्यापूर्वी हायकोर्टाच्या निकालाचे अवलोकन करून त्याचा सखोल अभ्यास केला जाईल आणि सरकारी वकिलांशी चर्चा करूनच ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे, असे सांगण्यात आले.

### आरोपी निर्दोष असतील तर..!

हायकोर्टाने या बॉम्बस्फोटातील सर्व आरोपींना निर्दोष सोडले आहे. ते खरोखरच निर्दोष असतील तर गेली १९ वर्षे त्यांना तुरुंगात सडावे लागले, त्याचे काय ? त्यातील प्रत्येक आरोपीची १९ वर्षे वाया गेली आहेत, त्याचे काय? त्यांच्या आयुष्यात वाया गेलेली वर्षे कशी भरून निघणार? असा प्रश्न या निमित्ताने आता पुढे येऊ लागला आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुंबई बॉम्बस्फोट : 12 आरोपी निर्दोष!

## 2006 साली 11 मिनिटांत 7 ठिकाणी झालेले स्फोट

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**मुंबईत 2006 साली झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणात उच्च न्यायालयाने आज (21 जुलै) महत्त्वाचा निकाल दिला. त्यानुसार मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील (MUMBA BLAST CASE) 12 आरोपींची निर्दोष सुटका करण्यात आली आहे. न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती आणि न्यायमूर्ती एस चांडक यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला.**





मुंबईतील लोकल ट्रेनमध्ये झालेल्या या साखळी बॉम्बस्फोटात 209 जणांचा मृत्यू झाला होता. तर 800 हून अधिकजण जखमी झाले होते. मात्र, उच्च न्यायालयाने याप्रकरणातील सर्व 12 आरोपींना निर्दोष सोडल्याने तपास यंत्रणांना मोठा झटका बसला आहे. दरम्यान, मुंबईतील लोकल ट्रेन्समध्ये 11 मिनिटांत सात ठिकाणी स्फोट झाले होते. चर्चगेट ते बोरिवली स्थानकांदरम्यान हे स्फोट झाले होते. या स्फोटांसाठी कुकर बॉम्बचा वापर करण्यात होता. मात्र, पोलीस आणि तपास यंत्रणांना याप्रकरणात न्यायालयात योग्यप्रकारे पुरावे सादर न करता आल्यामुळे 12 आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.2015 साली विशेष न्यायालयाने याप्रकरणातील 12 आरोपींना दोषी ठरवत पाच जणांना फाशी आणि सात जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेला आरोपींनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. पोलिसांनी आपल्याला मारहाण करुन जबाब नोंदवले असा आरोप याप्रकरणातील दोषींनी केला होता. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. आजच्या सुनावणीला आरोपींनी येरवडा, नाशिक, अमरावती आणि नागपूर कारागृहातून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे लावली हजेरी लावली होती. उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्यानंतर या आरोपींनी आनंद व्यक्त केला. यापूर्वी कनिष्ठ न्यायालयाने पाच जणांना फाशीची शिक्षा आणि उर्वरित सात आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने हा निकाल फिरवत 11 आरोपींची निर्दोष सुटका केली आहे. 19 वर्षांच्या प्रदीर्घ न्यायालयीन सुनावणीनंतर न्यायालयाने हा निकाल दिला. या निकालामुळे मुंबई पोलिसांच्या तपासाला झटका बसला आहे. न्यायालयाने मुंबई पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.मुंबईतील लोकल ट्रेनमध्ये झालेल्या या साखळी बॉम्बस्फोटात 209 जणांचा मृत्यू झाला होता. तर 800 हून अधिकजण जखमी झाले होते. मात्र, उच्च न्यायालयाने याप्रकरणातील सर्व 12 आरोपींना निर्दोष सोडल्याने तपास यंत्रणांना मोठा झटका बसला आहे. दरम्यान, मुंबईतील लोकल ट्रेन्समध्ये 11 मिनिटांत सात ठिकाणी स्फोट झाले होते. चर्चगेट ते बोरिवली स्थानकांदरम्यान हे स्फोट झाले होते. या स्फोटांसाठी कुकर बॉम्बचा वापर करण्यात होता. मात्र, पोलीस आणि तपास यंत्रणांना याप्रकरणात न्यायालयात योग्यप्रकारे पुरावे सादर न करता आल्यामुळे 12 आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.12 आरोपींना दोषी ठरवत पाच जणांना फाशी आणि सात जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेला आरोपींनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

### प्रकरणातील आतापर्यंतचे अपडेट्स

1. जुलै 2006 रोजी सात लोकल ट्रेनमध्ये बॉंबस्फोट
2. बॉंबस्फोटात 209 जणांचा मृत्यू, 800 हून अधिक जखमी
3. बॉंब असलेले प्रेशर कुकर लोकल ट्रेनमध्ये ठेवून स्फोट
4. स्फोटात 7 तर,बांद्रा-खार रोडच्या स्फोटात 22 ठार
5. जोगेश्वरीच्या स्फोटात 28,मीरा रोड-भायंदरमध्ये 31 ठार
6. माहिम दरम्यानच्या स्फोटात 28 आणि बोरिवलीमध्ये झाले स्फोट
7.इंडियन मुजाहिद्दीनच्या दहशतवाद्यांनी घडवले होते बॉंबस्फोट
8. मकोका कोर्टाकडून सप्टेंबर 2015 5 आरोपींना फाशी, 7 जन्मठेप
9. फैजल शेख,असिफ खान, कमाल अन्सारी,एहतेशाम सिद्दीकी,नाविद खान यांना फाशीची शिक्षा
10.फाशीच्या मंजुरीसाठी सरकारची उच्च न्यायालयात याचिका
11. 21 जुलै रोजी मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील 12 आरोपींची सुटका

# तुमचं राजकारण निवडणुकीत करा : कोर्ट

## कृपया आम्हाला काही बोलण्यास भाग पाडू नका : सरन्यायाधीश

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**म्हैसूर शहरी विकास प्राधिकरण (MUDA) घोटाळ्यातील आरोपी असलेल्या मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नी बीएम पार्वती यांना बजावण्यात आलेले समन्स रद्द करण्याच्या कर्नाटक उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अंमलबजावणी संचालनालयाने (ED) दाखल केलेली अपील सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली.**



यावेळी सरन्यायाधीश (CJI) बीआर गवई आणि न्यायमूर्ती के विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की राजकीय लढाया न्यायालयाबाहेर लढल्या पाहिजेत. अशा लढाया लढण्यासाठी ईडीचा वापर का केला जात आहे, असा प्रश्नही त्यांनी विचारला. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने ईडीची चांगलीच खरडपट्टी केली. मतदारांमध्ये राजकीय लढाई लढू द्या. त्यासाठी तुमचा वापर का केला जात आहे? अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केली. सरन्यायाधीश म्हणाले की, “दुर्दैवाने, मला महाराष्ट्रात काही अनुभव आहे. कृपया आम्हाला काही बोलण्यास भाग पाडू नका. अन्यथा आम्हाला अंमलबजावणी संचालनालय (ED) बद्दल खूप कठोर बोलावे लागेल. राजकीय लढाया मतदारांमध्ये लढू द्या. त्यासाठी तुमचा वापर का केला जात आहे?” न्यायालयाने विचारले. कोर्टाने खरडपट्टी करताच “ठीक आहे, आम्ही माघार घेऊ. पण ते एक उदाहरण म्हणून मानले जाऊ नये,” ईडीच्या वतीने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल (ASG) एसव्ही राजू म्हणाले. त्यानंतर न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आणि म्हटले की समन्स रद्द करणाऱ्या उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांनी स्वीकारलेल्या तर्कात कोणतीही चूक नव्हती.“एकल न्यायाधीशांच्या दृष्टिकोनात घेतलेल्या तर्कात आम्हाला कोणतीही चूक आढळत नाही.

### जमीन अधिकाऱ्यांना परत दिली


विशिष्ट तथ्ये आणि परिस्थितीत, आम्ही ते फेटाळून लावतो. काही कठोर टिप्पण्या वाचल्याबद्दल आम्ही एएसजीचे आभार मानले पाहिजेत,” असे न्यायालयाने म्हटले. या प्रकरणात म्हैसूर शहरी विकास प्राधिकरण (MUDA) द्वारे सिद्धरामय्या यांच्या पत्नी पार्वती यांना भ्रष्टाचार आणि जमिनीच्या अनियमित वाटपाच्या आरोपांचा समावेश आहे. तक्रारीनुसार, पार्वती यांना त्यांचा भाऊ स्वामी यांनी तीन एकरपेक्षा थोडा जास्त भूखंड ‘भेट’ दिला होता. सुरुवातीला ही जमीन अधिग्रहित केली गेली, नंतर अधिसूचित केली गेली आणि स्वामी यांनी खरेदी केली. खासगी व्यक्तींच्या मालकीची असली तरी ती MUDA ने विकसित केली.स्वामींनी दावा केला आहे की त्यांनी 2004 मध्ये ही जमीन खरेदी केली आणि ती त्यांच्या बहिणीला भेट दिली. तथापि, ही जमीन मुडा यांनी बेकायदेशीरपणे विकसित केली असल्याने, पार्वती यांनी भरपाईची मागणी केली.

# जगदीप धनखड यांनी दिला राजीनामा!

## पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय मंत्रिमंडळाचे मानले आभार

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना लिहिलेल्या एका पत्रात आरोग्यासंबंधी कारणे आणि उपचार घेण्याच्या सल्ल्याचा हवाला देत, संविधानाच्या कलम ६७(अ) अंतर्गत त्यांच्या राजीनाम्याची घोषणा केली आहे. दरम्यान धनखड यांनी या पत्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या मंत्रिमंडळाचेही सहकार्य केल्याबद्दल आभार मानले आहेत.**



राष्ट्रपती मुर्मू यांना लिहिलेल्या पत्रात जगदीप धनखड म्हणाले आहेत की, आरोग्याला प्राधान्य आणि वैद्यकीय सल्ल्याचे पालन करत मी भारताच्या उपराष्ट्रपती पदाचा संविधानाच्या ६७ (अ) कलमानुसार तात्काळ प्रभावाने राजीनामा देत आहे.राष्ट्रपतींना लिहिलेल्या पत्रात, धनखड यांनी पुढे त्यांच्या कार्यकाळात त्यांना मिळालेला पाठिंबा आणि सौहार्दपूर्ण संबंधांसाठी कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्रिमंडळाचे आभार मानले आणि त्यांचा पाठिंबा अमूल्य असल्याचे म्हटले आहे. तसेच आपल्या कार्यकाळादरम्यान त्यांच्याकडून खूप काही शिकल्याचेही धनखड यावेळी म्हणाले.संसदेतील सर्व सदस्यांकडून जे प्रेम, विश्वास आणि सन्मान मिळाला तो माझ्या आठवणीत जन्मभर राहिल. मी या महान लोकशाहीसाठी आभारी आहे, मला या महान लोकशाहीमध्ये उपराष्ट्रपती म्हणून अनुभव आणि ज्ञान मिळाले, जे अत्यंत मौल्यवान होते. ही माझ्यासाठी सौभाग्य आणि समाधानाची गोष्ट आहे की मी भारताची अभूतपूर्व आर्थिक प्रगती आणि परिवर्तनकारी काळातील वेगाने होणारा विकास पाहिला आणि त्यामध्ये माझं योगदान दिलं. या महत्त्वपूर्ण काळात सेवा करणे माझासाठी खरी सन्मानाची बाब आहे. आज मी हे पद सोडत आहे तेव्हा माझ्या मनात भारताचे यश आणि उज्वल भविष्यासाठी अभिमान आणि अतूट विश्वास आहे," असे धनखड त्यांच्या पत्रात म्हणाले आहेत.मार्च महिन्यात जगदीप धनखड यांना एम्समध्ये दाखल करण्यात आले होते. हृदयाशी संबंधीत इन्फेक्शन झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील त्यांची रुग्णालया जाऊन भेट घेतली होती. संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होताच धनखड यांनी राजीनामा दिला आहे. आजच अधिवेशनाचा पहिला दिवस होता.२०१४ मध्ये धनखड यांनी देशाचे १४ वे उपराष्ट्रपती म्हणून शपथ घेतली होती. ६ ऑगस्ट २०२२ रोजी उपराष्ट्रपती पदाची निवड झाली होती. यावेळी विरोधी पक्षाचा उमेदवार मार्गरेट अल्वा या होत्या, ज्यांना धनखड यांनी पराभूत केले. धनखड यांना ७२५ पैकी ५२८ मते मिळाली होती. तर विरोधी पक्षाच्या उमेदवाराला १८२ मते मिळाली होती.राष्ट्रपती मुर्मू यांना लिहिलेल्या पत्रात जगदीप धनखड म्हणाले आहेत की, आरोग्याला प्राधान्य आणि वैद्यकीय सल्ल्याचे पालन करत मी भारताच्या उपराष्ट्रपती पदाचा संविधानाच्या ६७ (अ) कलमानुसार तात्काळ प्रभावाने राजीनामा देत आहे.राष्ट्रपतींना लिहिलेल्या पत्रात, धनखड यांनी पुढे त्यांच्या कार्यकाळात त्यांना मिळालेला पाठिंबा आणि सौहार्दपूर्ण संबंधांसाठी कृतज्ञता व्यक्त केली. तसेच आपल्या कार्यकाळादरम्यान त्यांच्याकडून खूप काही शिकल्याचेही धनखड यावेळी म्हणाले.संसदेतील सर्व सदस्यांकडून जे प्रेम, विश्वास आणि सन्मान मिळाला.

### भारताची अभूतपूर्व आर्थिक प्रगती

मी या महान लोकशाहीसाठी आभारी आहे, मला या महान लोकशाहीमध्ये उपराष्ट्रपती म्हणून अनुभव आणि ज्ञान मिळाले, जे अत्यंत मौल्यवान होते. ही माझ्यासाठी सौभाग्य आणि समाधानाची गोष्ट आहे की मी भारताची अभूतपूर्व आर्थिक प्रगती आणि परिवर्तनकारी काळातील वेगाने होणारा विकास पाहिला आणि त्यामध्ये माझं योगदान दिलं. या महत्त्वपूर्ण काळात सेवा करणे माझासाठी खरी सन्मानाची बाब आहे. आज मी हे पद सोडत आहे तेव्हा माझ्या मनात भारताचे यश आणि उज्वल भविष्यासाठी अभिमान आणि अतूट विश्वास आहे," असे धनखड त्यांच्या पत्रात म्हणाले आहेत.मार्च महिन्यात जगदीप धनखड यांना एम्समध्ये दाखल करण्यात आले होते. हृदयाशी संबंधीत इन्फेक्शन झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

# ट्रम्प यांच्या 'त्या' दाव्यावरुन गदारोळ

## ऑपरेशन सिंदूरवरुन दोन नेते आमने-सामने; संसदेत काय काय घडलं?

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**संसदेचं पावसाळी अधिवेशन आजपासून सुरु झालं आहे. पहिल्याच दिवशी लोकसभा आणि राज्यसभेत गदारोळ आणि गोंधळ पाहण्यास मिळाला. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तान शस्त्रविरामाबाबत केलेला दावा आणि ऑपरेशन सिंदूर या दोन मुद्द्यावर खडाजंगी झाली.**



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमध्ये शस्त्रविराम घडवून आणल्याचा जो दावा केला होता त्या दाव्यावरुन आज लोकसभा आणि राज्यसभा दोन्हीकडे विरोधकांचा गदारोळ झाला. या गदारोळात राज्यसभेत एक विधेयक मंजूर करण्यात आलं. तसंच अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे जस्टिस यशवंत वर्मा यांना हटवण्याचा प्रस्तावही संसदेत मांडला गेला.

संसदेच्या दोन्ही सदनांची कारवाई सुरु झाली तेव्हा पहलगाम अतिरेकी हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि बिहारमध्ये लागू करण्यात आलेल्या एसआयआर वर चर्चा करा ही मागणी विरोधकांनी केली आणि हंगामा करण्यास सुरुवात केली. लोकसभेचे स्पीकर ओम बिर्ला यांनी विरोधी पक्षातील सदस्यांना प्रश्नोत्तराचा तास चालू द्या अशी विनंती केली. मात्र विरोधकांनी घोषणा सुरु ठेवल्या आणि ते सगळे वेलमध्येच उभे होते. ज्यानंतर ओम बिर्ला यांनी दुपारी १२ वाजेपर्यंत लोकसभा तहकूब केली.

१२ वाजता पुन्हा कामकाज सुरु झालं तेव्हा पुन्हा एकदा वेलमध्ये उतरुन विरोधी पक्षातील खासदारांनी घोषणा देण्यास सुरुवात केली.

ऑपरेशन सिंदूरवर चर्चा करा अशी मागणी विरोधी पक्षातील खासदारांनी केली. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं की आम्ही प्रत्येक मुद्द्यावर चर्चा करण्यास तयार आहोत. तुम्ही सदनाचं कामकाज चालू द्या. मात्र विरोधकांचा गदारोळ सुरु राहिला.

### दहशतवादी सापडलेले नाहीत

दरम्यान लोकसभेतल्या या गदारोळानंतर राहुल गांधी यांनी बोलण्याची संमती मागितली जी त्यांना देण्यात आली नाही. ज्यामुळे पुन्हा गदारोळ झाला. ज्यानंतर लोकसभेचं कामकाज आधी चार वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. लोकसभेत हा सगळा गदारोळ झाला तर राज्यसभेतही ट्रम्प यांच्या दाव्यावरुन गोंधळ पाहण्यास मिळाला.राज्यसभेत मल्लिकार्जुन खरगे आणि इतर विरोधी पक्षातील खासदारांनी ऑपरेशन सिंदूरबाबत चर्चा करा अशी मागणी केली. नियम २६७ च्या अंतर्गत चर्चा करा अशी विनंतीही केली. पण २२ एप्रिलला झालेल्या या दहशतवादी हल्ल्यानंतर अजूनही तो हल्ला करणारे दहशतवादी सापडलेले नाहीत किंवा त्यांना शोधून ठार मारण्यात आलेलं नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २४ वेळा हा उल्लेख केला की मी भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रविराम घडवून आणला.

# दिशा वकानी मालिकेत परतणार की नाही?

छोट्या पडद्यावरील 'तारक मेहता का उल्टा चश्मा' ही लोकप्रिय विनोदी मालिका आहे. ही मालिका मागील १७ वर्षांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. इतकी वर्षे उलटूनही मालिकेला प्रेक्षकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळतोय. मागील एका महिन्यापासून ही मालिका टीआरपी चार्टवर पहिल्या क्रमांकावर आहे. 'तारक मेहता का उल्टा चश्मा' या मालिकेत भूताचा ट्रॅक दाखवण्यात आला होता. हा ट्रॅक प्रेक्षकांना फार आवडला आणि मालिकेने टीआरपीच्या बाबतीत इतर अनेक मालिकांना मागे टाकलं आणि पहिल्या क्रमांकावर बाजी मारली. सध्या निर्माते दिलीप जोशी साकारत असलेल्या जेठालाल गडा या पात्रावर लक्ष केंद्रित करत आहेत. याच दरम्यान प्रेक्षकांना दयाबेनच्या पात्राची आठवण झाली आहे. प्रेक्षक निर्मात्यांना सातत्याने विचारत आहेत की दिशा वकानी मालिकेत कधी परतणार?'तारक मेहता का उल्टा चश्मा' मालिकेचे निर्माते असित मोदी यांनी टाइम्स ऑफ इंडियाशी बोलताना दयाबेनच्या पुनरागमनाबद्दल माहिती दिली आहे. तसेच मालिका पहिल्या क्रमांकावर पोहोचल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला आहे."दयाबेन मालिकेत कधी परतणार याबद्दल प्रेक्षक सतत विचारत असतात. दिशाजींनी आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांवर छाप सोडली आहे. त्यांनी मालिका सोडून ८ वर्षे झाली आहे. इतक्या वर्षांनंतरही लोक त्यांची आठवण काढतात. त्यांनी साकारलेले पात्र अजूनही लोकांच्या मनात जिवंत आहे, इतक्या उत्तम पद्धतीने त्यांनी ती भूमिका साकारली होती," असं असित मोदी म्हणाले.

# संजीव कुमार ऑटोग्राफ घ्यायला घरी आले होते

ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगांवकर यांनी मराठीसह हिंदी चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. त्यांनी हिंदी सिनेसृष्टीतील अनेक दिग्गजांबरोबर काम केलं आहे. बरेचदा सचिन पिळगांवकर काही कलाकारांबरोबरच्या त्यांच्या जुन्या आठवणी सांगत असतात. आता त्यांनी संजीव कुमार यांच्याबरोबरचा एक किस्सा सांगितला आहे. सचिन पिळगांवकर यांचा पहिला ऑटोग्राफ एका दिग्गज अभिनेत्याने घेतला होता, ते म्हणजे संजीव कुमार. "माझा पहिला ऑटोग्राफ एका माणसाने घेतला होता, ते मी कधीच विसरू शकत नाही. विशू राजे हे माझ्या वडिलांचे मित्र होते. त्यांना 'हा माझा मार्ग एकला' हा चित्रपट हिंदीमध्ये करायचा होता. तेव्हा मी १४-१५ वर्षांचा असेन. त्यांना तो चित्रपट हरीभाईंबरोबर म्हणजेच संजीव कुमार यांच्याबरोबर बनवायचा होता. त्यासाठी त्यांना एक ट्रायल ठेवली होती," असं सचिन पिळगांवकर यांनी रेडिओ सिटीला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं.पुढे ते म्हणाले, "हरीभाईंनी ट्रायलमध्ये पूर्ण सिनेमा पाहिला. सिनेमा पाहून बाहेर आले. सायंकाळचे सात वाजले होते. त्यांनी विशूराजेला विचारलं सचिन कुठे राहतो माहीत आहे का? ते म्हणाले 'मला माहिती आहे'. मग ते म्हणाले, 'मला घेऊन जाता का त्याच्याकडे...' ते लगेच म्हणाले, 'हो चला.' ते गाडीत बसले. जाताना सांताक्रुझमध्ये एका स्टेशनरी शॉपजवळ हरीभाईंनी गाडी थांबवली. एक ऑटोग्राफ बुक घेतलं. एक पेन विकत घेतला आणि ते घरी आले.

# परिणीती राघव शूटिंग सोडून गेले



बॉलीवूड अभिनेत्री परिणीती चोप्रा हिने आम आदमी पक्षाचे नेते राघव चढ्ढा यांच्याशी २०२३ मध्ये लग्न केले. लग्न केल्यानंतर परिणीती संसारात रमली आहे. ती चित्रपटही करतेय, पण मनोरंजन विश्वातील कार्यक्रमांपासून दूर असते. आता, लग्नाच्या जवळपास दोन वर्षांनंतर परिणीती व राघव दोघेही द ग्रेट इंडियन कपिल शोमध्ये दिसणार आहेत. पण या कार्यक्रमाचे शूटिंग त्यांना थांबवावे लागले. आयएएनएसच्या वृत्तानुसार, राघव याची आई आजारी पडल्याने त्यांना शूटिंग मध्येच थांबवावे लागले. रिपोर्ट्स नुसार, राघव यांची आई द ग्रेट इंडियन कपिल शोच्या शूटिंग दरम्यान सेटवर उपस्थित होत्या. अचानक त्यांची प्रकृती बिघडली. त्या सेटवर अचानक थरथर कापू लागल्याने त्यांना ताबडतोब रुग्णालयात नेण्यात आलं. त्यांच्याबरोबर परिणीती व राघवही गेले, त्यामुळे या एपिसोडचे शूटिंग पूर्ण होऊ शकले नाही. आता प्रोडक्शन टीम राघव आणि परिणीती यांच्याशी बोलून एपिसोड पुन्हा शूट करणार आहे. सध्या राघव यांच्या आईच्या प्रकृतीबद्दल कोणतीही माहिती मिळालेली नाही.लग्नानंतर राघव चढ्ढा आणि परिणिती चोप्रा पहिल्यांदाच एका शोमध्ये एकत्र हजेरी लावणार होते. पण द ग्रेट इंडियन कपिल शोचे शूटिंग सुरू असतानाच आईची प्रकृती बिघडल्याने त्यांना जावं लागलं. आता राघव व परिणीती यांच्या वेळापत्रकानुसार शोचे शूटिंग पुन्हा केले जाईल.दरम्यान, कोंकणा सेन शर्मा, पंकज त्रिपाठी, अनुराग बसू, फातिमा सना शेख, आदित्य रॉय कपूर, सारा अली खान, गौतम गंभीर, ऋषभ पंत, युजवेंद्र चहल, अभिषेक शर्मा, ऋषभ पंत, प्रतीक गांधी, जितेंद्र कुमार, अजय देवगण, मृणाल ठाकूर, विंदू दारा सिंग, संजय मिश्रा, रवी किशन, कुब्बरा सैत आणि दीपक डोबरियाल या पाहुण्यांनी हजेरी लावली आहे.

# रिंकू राजगुरूचा जबरदस्त डान्स

रिंकू राजगुरु आणि आकाश ठोसर यांच्या मुख्य भूमिका असलेला 'सैराट' सिनेमा २०१६ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या सिनेमाने मराठी बॉक्स ऑफिसवर एक वेगळीच जादू निर्माण केली होती. 'सैराट'ने १०० कोटींचा गल्ला जमावून इतिहास रचला होता. नागराज मंजुळे यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं होतं. याशिवाय या सिनेमाचा राष्ट्रपती पुरस्काराने देखील सन्मान करण्यात आला होता. 'सैराट' सिनेमातील गाणी आज ९ वर्षांनंतरही सर्वत्र तुफान लोकप्रिय आहेत. या सिनेमामुळे आर्ची-परश्याची जोडी घराघरांत लोकप्रिय झाली होती. विशेषतः आर्चीचा बेधडक आणि रुबाबदार अंदाज सर्वांच्या पसंतीस उतरला होता. आता पुन्हा एकदा या सिनेमाच्या आठवणी ताज्या होण्याचं कारण म्हणजे रिंकूने केलेला जबरदस्त डान्स.'सैराट' सिनेमाची मुख्य अभिनेत्री रिंकू राजगुरुने नुकताच "सैराट झालं जी..." या गाण्यावर जबरदस्त डान्स केला. पारंपरिक लूकमध्ये सुंदर असा पारंपरिक ड्रेस घालून रिंकूने 'सैराट' गाण्यावर ठेका धरला होता. लोकप्रिय कोरिओग्राफर नोएल अलेक्झांडर याने तिला 'सैराट' गाण्यावर डान्स करताना साथ दिली.रिंकू राजगुरु या डान्स व्हिडीओला कॅप्शन देत लिहिते, "पहिलं ते पहिलंच असतं...सैराट झालं जी" अभिनेत्रीच्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कमेंट्सचा पाऊस पाडला आहे. "एकदम झकास रिंकू ताई", "मस्तच... अजून काय हवं", "आता हा ट्रेंड पूर्ण झाला", "आता सैराटचा दुसरा भाग काढा", "रिंकू लय भारी डान्स" अशा प्रतिक्रिया युजर्सनी अभिनेत्रीच्या पोस्टवर दिल्या आहेत. याशिवाय बहुतांश नेटकऱ्यांनी, "व्हिडीओमध्ये फक्त आकाश ठोसरची कमी आहे", "रिंकू आणि आकाशने एकत्र डान्स केला पाहिजे", "मिसिंग आकाश ठोसर अशा कमेंट्स व्हिडीओवर केल्या आहेत." कारण, सिनेमाने परश्याची भूमिका त्यानेच साकारली होती.



# अहान पांडेचं कौतुक करणाऱ्याला करणने सुनावलं

करण जोहर बॉलीवूडमधील लोकप्रिय दिग्दर्शक आहे. त्याने आजवर अनेक प्रसिद्ध चित्रपटांचं दिग्दर्शन केलं आहे. करण सोशल मीडियावरही सक्रिय असून अनेकदा चित्रपट व कलाकारांबद्दल तो बोलताना दिसतो. अशातच त्याने नुकतीच 'सैयारा' चित्रपटासंबंधित सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. परंतु, यामुळे त्याला नेटकऱ्याने ट्रोल केल्याचं पाहायला मिळालं. करण जोहरने सोशल मीडियावर केलेल्या पोस्टवर एका नेटकऱ्याने कमेंट करत त्याला ट्रोल करण्याचा प्रयत्न केला. परंतु, करणने ट्रोल करणाऱ्याला स्पष्ट उत्तर दिल्याचं पाहायला मिळतं. करणने सोशल मीडियावर सध्या चर्चेत असलेल्या 'सैयारा' चित्रपटासंबंधित पोस्ट शेअर केली आहे. यामधून त्याने चित्रपट पाहिल्यानंतरची त्याची प्रतिक्रिया दिली आहे. करणने इन्स्टाग्रामवर पोस्ट करत चित्रपटात मुख्य भूमिकांमध्ये असलेल्या कलाकारांचं कौतुक केलं आहे. तो म्हणाला, "अहान तू तुझ्या पदार्पणातील चित्रपटात खूप छान काम केलं आहेस, तुझ्या डोळ्यातील भाव मनाला भिडणारे होते. तुझा चित्रपटसृष्टीतील या पुढचा प्रवास पाहण्यासाठी मी उत्सुक आहे. अनित, तू खूप सुंदर दिसतेस. खूप प्रेमळ आहेस. तुझं चित्रपटातील काम पाहून माझ्या डोळ्यात अश्रू आले. अहान व तू तुम्ही दोघांनीही खूप छान काम केलं आहे."करणच्या या पोस्टखाली एका नेटकऱ्याने 'आ गया नेपोकिडका दायजान' अशी कमेंट केली होती. परंतु, करणने या नेटकऱ्याला, "गप्प बस, घरी बसल्या बसल्या नकारात्मकता पसरवू नकोस. दोन मुलांचं काम बघ आणि स्वतःपण काहीतरी काम कर", असं स्पष्ट उत्तर दिलं आहे.करणने या पोस्टमधून चित्रपटातील कलाकारांसह दिग्दर्शक, निर्मात्यांचंही कौतुक केलं आहे. करण म्हणाला, "मी शेवटचा कोणता चित्रपट पाहिल्यानंतर मला असं वाटलं होतं हे आठवत नाही.यशराज प्रोडक्शनने पुन्हा एकदा एका चांगल्या चित्रपटाची निर्मिती केली आहे."करण पुढे म्हणाला, "आदित्य चोप्रा आय लव्ह यू, मला अभिमान आहे की मी यशराज प्रोडक्शनचा विद्यार्थी आहे. अक्षय्ये विधिनी एका कमाल चित्रपटाची निर्मिती करत तुम्ही निर्माता म्हणून पदार्पण केलं आहे. अभिनंदन. सैयारा हा मोहित सुरीच्या आयुष्यातीलएक उत्कृष्ट चित्रपट आहे. तू कमाल चित्रपट बनवला आहेस. म्युझिक खूप कमाल आहे."करण जोहर बॉलीवूडमधील लोकप्रिय दिग्दर्शक आहे. त्याने आजवर अनेक प्रसिद्ध चित्रपटांचं दिग्दर्शन केलं आहे. करण सोशल मीडियावरही सक्रिय असून अनेकदा चित्रपट व कलाकारांबद्दल तो बोलताना दिसतो. अशातच त्याने नुकतीच 'सैयारा' चित्रपटासंबंधित सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. परंतु, यामुळे त्याला नेटकऱ्याने ट्रोल केल्याचं पाहायला मिळालं. करण जोहरने सोशल मीडियावर केलेल्या पोस्टवर एका नेटकऱ्याने कमेंट करत त्याला ट्रोल करण्याचा प्रयत्न केला. परंतु, करणने ट्रोल करणाऱ्याला स्पष्ट उत्तर दिल्याचं पाहायला मिळतं.

# भारत-पाकिस्तान सामना रद्द!

## सामना रद्द झाल्याने शाहीद आफ्रिदी संतापला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि पाकिस्तान यांच्यात २० जुलै रोजी वर्ल्ड चॅम्पियनशिप लीगमध्ये २०२५ मध्ये सामना खेळवला जाणार होता. पण युवराज सिंग्याच्या नेतृत्त्वाखालील भारतीय संघातील खेळाडूंना पहलगाम हल्ल्याचा निषेध म्हणून सामन्यातून माघार घेतली आणि परिणामी भारत-पाकिस्ता सामना रद्द करावा लागला. भारताच्या खेळाडूंनी सामना खेळण्यापासून नकार दिल्याने पाकिस्तानचा खेळाडी शाहीद आफ्रिदी चांगलाच संतापला आहे. सामना रद्द झाल्यानंतर प्रतिक्रिया देतानाचा त्याचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.**



हरभजन सिंग, इरफान पठाण, युसूफ पठाण, शिखर धवन, सुरेश रैना आणि युवराज सिंग यांसारख्या इंडिया चॅम्पियन्सच्या खेळाडूंनी WCL 2025 मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यातून माघार घेतली होती, म्हणजेच त्यांनी खेळण्यास नकार दिला होता. आता जर १५ पैकी ५-६ खेळाडू खेळले नाहीत, तर प्लेइंग इलेव्हन कशी तयार होणार? परिणामी, आयोजकांना सामना रद्द करावा लागला. भारत-पाकिस्तान सामना रद्द झाल्यानंतर, पाकिस्तान चॅम्पियन्सचा कर्णधार शाहिद आफ्रिदीनेही त्यावर प्रतिक्रिया दिली.शाहिद आफ्रिदीने शेवटच्या क्षणी सामना रद्द झाल्याचा निषेध केला. भारतीय खेळाडूंनी त्याच्याविरुद्ध खेळण्यास नकार दिल्याने त्याला खूप धक्का बसला होता. शाहिद आफ्रिदी म्हणाला की, “आम्ही WCL मध्ये क्रिकेट खेळण्यासाठी आलो आहोत आणि माझ्या मते क्रिकेट हे राजकारणापासून दूर ठेवलं पाहिजे. खेळाडू हा त्याच्या देशाचा चांगला सदिच्छादूत असावा, त्याच्यामुळे देशवासीयांची मान खाली जायला नको. जर भारताला आमच्याविरुद्ध खेळायचं नव्हतं, तर त्यांनी इथे येण्याआधीच नकार द्यायला हवा होता. पण, भारतीय खेळाडू केवळ आलेच नाहीत तर सरावही केला आणि नंतर अचानक खेळण्यास नकार दिला.”वर्ल्ड चॅम्पियन लीगमध्ये २० जुलै रोजी बर्मिंगहम येथे भारत आणि पाकिस्तान संघांमधील सामना होणार होता. काही माध्यमांच्या वृत्तानुसार, भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानविरुद्ध खेळण्यास नकार देण्यामागे शाहिद आफ्रिदी देखील कारणीभूत आहे. कारण पहलगाम हल्ल्यादरम्यान हा पाकिस्तानी क्रिकेटपटू त्याच्या वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत होता.भारताविरुद्धचा सामना रद्द झाल्यानंतर, पाकिस्तान चॅम्पियन्स संघाच्या मालकाने सांगितलं की, त्यांना पूर्ण २ गुण मिळाल्याचा आनंद आहे आणि संघ याचा हकदार आहे. त्यांनी सांगितलं की, स्पर्धेतील पुढील सामने वेळापत्रकानुसार होतील. बाद फेरीत, भारत आणि पाकिस्तान एकमेकांशी भिडणार नाहीत याची खात्री बाळगण्याचा आम्ही प्रयत्न करू. हे दोन्ही संघ अंतिम फेरीत पोहोचल्यास एकमेकांविरूद्ध खेळतील की नाही याचा निर्णय त्यावेळी घेतला जाईल.हरभजन सिंग, इरफान पठाण, युसूफ पठाण, शिखर धवन, सुरेश रैना आणि युवराज सिंग यांसारख्या इंडिया चॅम्पियन्सच्या खेळाडूंनी WCL 2025 मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यातून माघार घेतली होती, म्हणजेच त्यांनी खेळण्यास नकार दिला होता. आता जर १५ पैकी ५-६ खेळाडू खेळले नाहीत, तर प्लेइंग इलेव्हन कशी तयार होणार? परिणामी, आयोजकांना सामना रद्द करावा.

### बुमराहला विश्रांती दिली जाणार

लागला. भारत-पाकिस्तान सामना रद्द झाल्यानंतर, पाकिस्तान चॅम्पियन्सचा कर्णधार शाहिद आफ्रिदीनेही त्यावर प्रतिक्रिया दिली. शाहिद आफ्रिदीने शेवटच्या क्षणी सामना रद्द झाल्याचा निषेध केला. भारतीय खेळाडूंनी त्याच्याविरुद्ध खेळण्यास नकार दिल्याने त्याला खूप धक्का बसला होता. शाहिद आफ्रिदी म्हणाला की, “आम्ही WCL मध्ये क्रिकेट खेळण्यासाठी आलो आहोत आणि माझ्या मते क्रिकेट हे राजकारणापासून दूर ठेवलं पाहिजे.
खेळाडू हा त्याच्या देशाचा चांगला सदिच्छादूत असावा, त्याच्यामुळे देशवासीयांची मान खाली जायला नको. जर भारताला आमच्याविरुद्ध खेळायचं नव्हतं, तर त्यांनी इथे येण्याआधीच नकार द्यायला हवा होता. पण, भारतीय खेळाडू केवळ आलेच नाहीत तर सरावही केला आणि नंतर अचानक खेळण्यास नकार दिला.”वर्ल्ड चॅम्पियन लीगमध्ये २० जुलै रोजी बर्मिंगहम येथे भारत आणि पाकिस्तान संघांमधील सामना होणार होता.

# तुम्ही माझ्या बाबांना मारलं

## श्रीसंतच्या लेकीचे शब्द ऐकून हरभजनच्या काळजाचा ठोका चुकला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयपीएलच्या स्पर्धेतील सर्वात मोठा वाद म्हणजे हरभजन सिंगने सामन्यादरम्यान श्रीसंतच्या कानशिलात लगावली होती. भरमैदानात सर्वांसमोर रागाच्या भरात हरभजनने श्रीसंतला मारलं होतं. ही घटना संपूर्ण क्रिकेट जगतात वाऱ्यासारखी पसरली होती आणि त्यामुळे हरभजनवर आयपीएलच्या उर्वरित हंगामासाठी बंदी घालण्यात आली होती.**



यानंतर हरभजनने अनेकदा श्रीसंतची याबाबत माफी मागितली. पण श्रीसंतची लेक हरभजनला जे वाक्य म्हणाली होती, जे ऐकून त्याच्या काळजाचं पाणी झालं होतं.अलीकडेच, हरभजन सिंग रविचंद्रन अश्विनच्या कुट्टी स्टोरीज विथ अॅश या युट्युब चॅनेलकरता मुलाखतीसाठी पोहोचला होता. काही घटना सांगितल्या आणि मजेशीर प्रसंगही सांगितले. पण आयपीएलमध्ये श्रीसंतसह झालेल्या वादाचा उल्लेख करताना हरभजन गहिवरला होता. या घटनेचा उल्लेख करत ही घटना आपल्या कारकिर्दीतून काढून टाकू इच्छितो असं त्याने सांगितलं.

### मैदानात मारली होती कानाखाली

२००८ च्या आयपीएल हंगामात मुंबई इंडियन्सकडून खेळत असताना, हरभजनने एका सामन्याच्या शेवटी किंग्ज इलेव्हन पंजाबच्या श्रीसंतला कानाखाली लगावली होती. यानंतर, बीसीसीआयने हरभजनला उर्वरित सामन्यांसाठी निलंबित केले, परंतु इतकी वर्षे उलटून गेल्यानंतरही ही घटना हरभजनच्या तशीच डोक्यात आहे, ज्यात त्याने पूर्णपणे स्वतः:ची चूक असल्याचं सांगितलं.आर अश्विनच्या यूट्यूब चॅनेलवरील ‘कुट्टी स्टोरीज’ या शोमध्ये बोलताना, हरभजनला विचारण्यात आलं की त्याला त्याच्या आयुष्यातील कोणती घटना पुसून टाकायची आहे का? याचं उत्तर देताना तो म्हणाला, “माझ्या आयुष्यात मला एक गोष्ट बदलायची आहे ती म्हणजे श्रीसंतसह घडलेली घटना. मला ती घटना माझ्या कारकिर्दीतून काढून टाकायची आहे. ही अशी घटना आहे जी मी मला बदलायची आहे. पुढे बोलताना हरभजन सिंग म्हणाला, “मी २०० वेळा माफी मागितली. त्या घटनेनंतर अनेक वर्षे मी प्रत्येक प्रसंगी किंवा स्टेजवर माफी मागत आलो आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। मंगळवार ।

। दि. 22 जुलै 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती






# प्रियदर्शनी स्कूलची “सेंटर ऑफ एक्सलन्स” म्हणून निवड!

## शिक्षण विश्व: राष्ट्रीय स्तरावर मान्यता, शिक्षक, विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पिंपरी-चिंचवड: शिक्षण क्षेत्रात सातत्यपूर्ण गुणवत्ता, नावीन्यपूर्ण उपक्रम आणि लहान मुलांच्या सर्वांगीण विकासावर भर देणाऱ्या प्रियदर्शनी स्कूल, आळंदी यांना प्रतिष्ठित “CENTRE FOR EXCELLENCE IN EARLY YEARS” म्हणून गौरविण्यात आले आहे. ही निवड ASSOCIATION OF INDIAN PRINCIPALS (AIP) या राष्ट्रीय स्तरावरील प्रमुख संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे.**





या गौरवाबरोबरच शाळेला INDIA EARLY CHILDHOOD EXCELLENCE INDEX 2025 या महत्वाकांक्षी आणि व्यापक राष्ट्रीय उपक्रमात PARTNER SCHOOL म्हणून मान्यता मिळाली आहे. हा उपक्रम भारतभरातील पूर्व-प्राथमिक शिक्षणामध्ये गुणवत्ता, नावीन्य आणि एकसंध शैक्षणिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी राबवला जात आहे.

प्रियदर्शनी स्कूलच्या पूर्व-प्राथमिक शिक्षण पद्धती, शिक्षकांचे समर्पण, तसेच शाळेचे दूरदृष्टीपूर्ण आणि बालक-केंद्री धोरण यांची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सीमा फाटक यांनी या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले, “हे यश संपूर्ण शाळा परिवाराच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. आमचा उद्देश केवळ शैक्षणिक गुणवत्तेपुरता मर्यादित नसून, विद्यार्थ्यांच्या भावनिक, सामाजिक आणि बौद्धिक विकासाकडेही आमचा विशेष भर असतो.”

### प्रियदर्शनी स्कूलची आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख

शाळेतील शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी यांनी या यशाचे स्वागत करत मुख्याध्यापिका आणि व्यवस्थापन मंडळाचे अभिनंदन केले आहे. प्रियदर्शनी स्कूलने गेल्या काही वर्षांत आधुनिक अध्यापन तंत्र, शिक्षकांचे सतत प्रशिक्षण, आणि विद्यार्थी-केंद्रित उपक्रम यांद्वारे शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. विशेषतः ३ ते ६ वयोगटातील मुलांच्या शिक्षणात त्यांनी केलेल्या सुधारणात्मक आणि प्रयोगशील उपक्रमांना शैक्षणिक तज्ज्ञांकडूनही दाद मिळाली आहे. या निवडीमुळे प्रियदर्शनी स्कूलचे नाव आता राष्ट्रीय स्तरावर घेतले जात असून, अन्य शाळांसाठीही ते एक प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

---

# ‘एमआयटी’तर्फे “इंटरन्शिप व ऑन-द-जॉब ट्रेनिंग” कार्यशाळा

## विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद : प्रत्यक्ष अनुभव देऊन सक्षम बनवण्याचा संकल्प

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी (डी), पुणे येथील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या “इंटरन्शिप्स अँड ऑन-द-जॉब ट्रेनिंग मीट” या एकदिवसीय कार्यशाळेला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शुक्रवार, ११ जुलै २०२५ रोजी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली असून, ती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत प्रायोजित होती.**



विद्यार्थ्यांना उद्योगजगतातील प्रत्यक्ष अनुभव देऊन त्यांना सक्षम बनवणे या मुख्य उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत विविध सत्रांद्वारे रोजगारक्षमतेस चालना देण्यावर भर देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, विश्वशांती प्रार्थना व विद्यापीठ गीताने झाली. त्यानंतर डॉ. एम. ए. आतितकर (उपसंचालक) यांनी स्वागतपर भाषण केले, तर डॉ. बी. बी. वाफारे (संचालक) यांनी उद्घाटन सत्रात मनोगत व्यक्त केले.

दुसऱ्या सत्रात श्री. सचिन देशपांडे (संस्थापक व सीईओ, ERFINDEN TECHNOLOGY PVT. LTD.) यांनी “WORKPLACE SKILLS FOR INTERNS” या विषयावर मार्गदर्शन करताना इंटर्न्ससाठी आवश्यक असलेली कौशल्ये, उद्योगातील प्रत्यक्ष अपेक्षा आणि वर्तमान आव्हानांवर सविस्तर चर्चा केली. तिसऱ्या सत्रात डॉ. देवीदास गोल्हार (संचालक - इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकजेस, एसपीपीयू) यांनी “आजच्या काळात इंटरन्शिप / OJT चे महत्व” या विषयावर आपले विचार मांडले.

त्यांनी जागतिक स्तरावर उपलब्ध असलेल्या नोकरीच्या संधींविषयी माहिती देत त्या संधींसाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांवर भर दिला.

कार्यशाळेच्या समारोप सत्रात सहभागी विद्यार्थ्यांना व आमंत्रित एचआर प्रतिनिधींना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. यावेळी एचआर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रश्नोत्तर सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी, प्राध्यापकांनी व उद्योगतज्ज्ञांनी संवाद साधला आणि आपले अनुभव शेअर केले.

### विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा मार्गदर्शक...

या उपक्रमात १३६ विद्यार्थी, १५ हून अधिक प्राध्यापक व पुणे परिसरातील ३० पेक्षा जास्त एचआर व उद्योगतज्ज्ञ सहभागी झाले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राशी थेट संपर्क साधण्याची संधी मिळाली. ट्रेंड्स, कौशल्यांची गरज, व्यावसायिक वर्तन व नोकरीच्या संधींवर सखोल चर्चा झाली. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन डॉ. मंगेश भोपळे (अधिष्ठाता - प्रशिक्षण व नियुक्ती विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यशस्वी आयोजनासाठी श्रीम. सायली कोल्हटकर, श्रीम. ज्योत्स्ना पाटील, श्रीम. ममता चव्हाण, श्री. अक्षय महाजन, श्री. चेतन वाघ, श्री. मिलिंद शिंदे, प्रा. पल्लवी महागावकर व प्रा. माधुरी दरेकर आदींनी मोलाचे योगदान दिले. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरली असून, भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल, असा विश्वास सहभागी मान्यवरांनी व्यक्त केला.

DYP
DR. D. Y. PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

# Dr D Y Patil Educational Complex, Akurdi, Pune

*Approved by AICTE, DTE, MSBTE & Govt. of Maharashtra,*
*Accredited by NBA & Grade Status by NAAC, Affiliated to Savitribai Phule Pune University*

**ADMISSIONS OPEN 2025-26**

41 YEARS Academic Excellence

## Experience D Y Patil Educational Complex



- **15k+** Students Placed
- **52 LPA** Highest Package
- **50,000+** Alumni
- **1000+** Empanelled Recruiters
- **150+** University Toppers

## Our Institutes

### D Y Patil College of Engineering (Autonomous)
*NRI Quota Open: AY 2025 – 26*
Accredited by NAAC with 'A' Grade & NBA
*UG – Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A*
*PG – Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A*
*PhD – Mech / E&TC / Civil*

### D Y Patil Institute of MCA & Management
Accredited by NAAC with 'A' Grade & Affiliated to SPPU
*MCA / MBA / PhD (Management)*

### Dr D Y Patil College of Architecture
Accredited by NAAC with 'A' Grade & Approved by COA
*B Arch / M Arch (Construction Management) / D Arch*

### D Y Patil PGDM Institute, Akurdi, Pune
*NRI Quota Open: AY 2025 – 26*
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
*Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management*

### Dr D Y Patil College of Agriculture Business Management
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
*BSc (Hons) Agri Business Management*

### Dr D Y Patil College of Pharmacy
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
Accredited by NBA & NAAC with 'A+' GRADE
*D Pharm / B Pharm / Pharm D / M Pharm (Phcol) / M Pharm (Pharmaceutics) / M Pharm (DRA) / M Pharm (PQA) / M Pharm (Pchem) / M Pharm (PP) / PhD*

### Dr D Y Patil Institute of Pharmacy
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
*D Pharm*

### Y B Patil Polytechnic
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
*Diploma in Civil / Mech / Comp / E&C (Accredited by NBA)*

## Campus at a Glance

- Beautifully landscaped lush green campus
- Virtual Lab Nodal Centre of IIT Bombay
- Digital Classrooms & Libraries
- Online Teaching Learning Platforms
- Highly Qualified & Experienced Faculty
- Outstanding academic results
- Collaboration with International Universities
- Wi-Fi enabled campus / ERP Enabled Administration
- Extravagant Cafeterias & Sports Complex
- Ultra-modern Auditoriums, Seminar Halls
- Conducive & disciplined environment
- Incubation & Startup ecosystem
- State-of-the-Art Hostel for Girls & Boys

## Corporate Relations & Placement Cell

- Strong Alumni engagement
- Internship Opportunities in Industry
- Industry-Centric Training Programs
- International Placement Opportunities
- Notable Placement Record
- Employability Assessment Test conducted by SHL for students (First year to Final Year)
- Corporate Tie-ups & Partnerships with industry for student enrichment activities
- Participation of students in Hackathons & competitions organized by Industries
- Thrust on Personality Development, Soft Skills & Communication Skills in English in Language Laboratories

## Collaborations with Industry (MOU's & COE's)

JENDAMARK, wipro, NTT DATA, virtusa, B&R, Emcure, KNORR-BREMSE, NuLife, CitiusTech, SHL, McKinley Rice, bvg, Technoveniq, RPG, NASSCOM FOUNDATION, INDOVANCE, Tech Mahindra, DataTech Labs, EMERSON, newgen

SECTOR NO. 29, NIGDI PRADHIKARAN, AKURDI, PUNE 411044, MAHARASHTRA, INDIA
www.dypakurdipune.edu.in | admission@dypakurdipune.edu.in | @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE

**"Discover, Learn, Lead—The D Y Patil Way."**


Pune District Education Association's
**Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy**
**Saswad, Pune - 412301**
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| Activity | Date |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



**Your Trusted Facilitation Centre!**

**FC Code 6372**

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

**"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"**

**Confirm Your Application Now!**



Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

# न्यायालयाची महापालिकेला ‘कारणे दाखवा’ नोटीस

## प्रार्थनास्थळ प्रकरण : चिखली, कुदळवाडीतील अनधिकृत प्रार्थनास्थळांना नोटीस

| पिंपरी- चिंचवड | प्रतिनिधी : महाईन्यूज |

**चिखली, कुदळवाडीतील अनधिकृत प्रार्थनास्थळांना पिंपरी-चिंचवड महापालिकेने बांधकाम पाडण्यासाठी नोटिसा बजावल्या आहेत. या प्रकरणी दाखल याचिकेनंतरर आकुर्डी येथील न्यायालयाने महापालिका प्रशासनाला कारणे दाखवा नोटीस दिली आहे. तसेच, संबधितांकडून स्पष्टीकरण मागितले आहे.**



अॅड.असीम सरोदे, अॅड. श्रीया आवले, अॅड. रोहित टिळेकर, अॅड. अरहंत धोत्रे यांनी एकूण १६ प्रार्थनास्थळांबाबत आक्षेप अर्ज आकुर्डीच्या न्यायालयात दाखल केला होता. कोणत्या जमिनीवर कोणत्या भागात अतिक्रमण आहे. जे बांधकाम आहे ते अनियमित, अनधिकृत की बेकायदेशीर आहे. याबाबत स्पष्ट उल्लेख नोटीसमध्ये नाही. महाराष्ट्र नगर रचना कायद्याच्या कलम ३५ नुसार अशा चुकीच्या पद्धतीने नोटीस देणे बेकायदेशीर आहे. कायद्याची प्रक्रिया न करता व अतिक्रमण हटविण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचना प्रशासनाने पाळलेल्या नाहीत.

चिखली, कुदळवाडी येथील संबंधित नागरिकांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आलेली नाही, असे मुद्दे याचिकेत मांडण्यात आले होते. याचिकेतील आक्षेपानंतर आकुर्डी न्यायालयाने पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाला कारणे दाखवा नोटीस दिली आहे. तसेच संबधितांनी ३१ जुलैपर्यंत उत्तर दाखल करावे,असे आकुर्डी येथील न्यायालयाने आदेशात स्पष्ट करण्यातआले आहे.




KES'S PRATIBHA GROUP OF INSTITUTES'

PRATIBHA COLLEGE OF COMMERCE & COMPUTER STUDIES

ACCREDIATED WITH GRADE A NAAC

Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

ADMISSIONS OPEN FOR THE YEAR 2025-26

UG & PG Courses in Arts, Commerce, Science, Computer Science & Management

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| B.A. English/ Economics/ Psychology | B.Com. Regular | B.Com. Business Management | B.Com. International Business | B.Com. Computer Application | B.Sc. Chemistry | B.Sc. Statistics |
| B.Sc. Cyber Security | B.Sc. Computer Science | B.Sc. Computer Application | B.Sc. Data Science | B.Sc. Information Technology | | M.Com |
| B.Sc. Cyber & Digital Sci. | | B.Sc. Nano Sci. & Nano Tech. | | B.Sc. AI & Machine Learning | | PH.D. Commerce & Management |
| M.Sc. Cyber Security | M.Sc. Data Science | M.Sc. Computer Science | M.Sc. Computer Application | M.Sc. Statistics/ Organic Chemistry | M.A. English/ Psychology | PH.D. English |

Eligibility: For Under Graduation : Passed 12th (HSC) | for Post Graduation: Graduation in respective field

For Admission Enquiry Call : 8600189162, Timings: 9 am to 5 pm

Campus: Block D-III, Plot No. 3, Behind Mehta Hospital, Old Mumbai Pune Highway, Kalbhor Nagar, Chinchwad, Pune 19

For more details please visit us at: www.pcccs.org.in


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17k+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13k+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org